प्रेसनोट

दिनांक –०४/०३/२०२३

लोकसेवक श्री. रणजित दिनकर डोळे, वय २५ वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी, (वर्ग–३) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | पेल्हार पोलीस ठाणे, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय |
| ३ | कलम | भ.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७(अ), १३(१) (अ), १३(२) प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री. रणजित दिनकर डोळे, वय २५ वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी, (वर्ग–३) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे राहते घर वन विभाग मांडवी कार्यालयाकडून तोडण्यात आले होते. याकारणास्तव तक्रारदार यांचे मांडवी येथील फॉरेस्ट कार्यालयात येणे जाणे होत होते. त्यावेळी सदर कार्यालयातील वनरक्षक रणजित डोळे हे त्यांचे संपर्कात येवून त्यांची ओळख झाली. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना संपर्क साधुन त्यांना घर बांधण्यासाठी दुसरी जागा देतो त्यावर घराचे बांधकाम करा असे सांगून गाव मौजे तिल्हेर येथील सर्वे नं.२५६/२७ जागा दाखविली. सदरची जागा कमी किमतीमध्ये मिळवून देवून सदर जमिनीवर बांधकाम केल्यास त्यावर वन विभागाकडून कारवाई न होण्यासाठी यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे २,००,०००/–रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक ०३/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०४/०३/२०२३ रोजी तक्रारदार यांना आलोसे यांना भेटण्यासाठी पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आलोसे हे वनरक्षक असून त्यांनी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून वन विभागाकडून भुमीहिन आदीवासींना वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी सहा गुंठे जमिन तक्रारदार यांचे नावावर करून देण्यासाठी दिड लाख रूपये प्रति गुंठेप्रमाणे सहा गुंठयाचे एकुण नऊ लाख रूपये जमिन ज्यास वाटप करण्यात आले त्याच्यासाठी व त्या जागेवर बांधकाम करताना कारवाई न करण्यासाठी ५०,०००/– रूपये स्वतःसाठी लाचेची मागणी करून २०,०००/–रूपये लाच स्विकारताना यातील आलोसे यांना १५:४०वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– —
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी कमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क. :– 9923346810

(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर